देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाचे

# न्या. तात्यासाहेब आठल्ये कला , वेद. शं. रा. सप्रे वाणिज्य, विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), देवरूख

स्व. काकासाहेब पंडित शैक्षणिक संकुल ,देवरूख , जि- रत्नागिरी - ४१५८०४




## पदवीपूर्व कृषी अभ्यासक्रम

## B. voc. Agriculture

## शैक्षणिक वर्ष -२०२५-२६

### ❖ नवीन ज्ञानाच्या विश्वात तुमचं मनःपूर्वक स्वागत..!

आधुनिक शेतीच्या आव्हानांना तोंड देताना आणि निसर्गाशी सुसंवाद राखताना, शाश्वत शेती शिक्षण तुमच्या भविष्यासाठी एक मजबूत पाया ठरू शकते. शाश्वत शेती म्हणजेच पर्यावरणस्नेही, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि सामाजिकदृष्ट्या न्याय्य अशी शेती, जी आपली निसर्गाशी समतोल राखून टिकाऊ भविष्य निर्माण करते. शाश्वत शेती ही केवळ व्यवसाय नाही, ती एक जबाबदारी आहे. आपल्या भविष्याचा आणि पुढील पिढ्यांच्या निरोगी जीवनाचा पाया आहे.






### ❖ हा अभ्यासक्रम का निवडावा?

आमचा पदवीपूर्व कृषी अभ्यासक्रम विद्यार्थांना आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, जैविक कीडनियंत्रण, मृदा संवर्धन आणि जलव्यवस्थापन याबद्दल सखोल ज्ञान देईल. तुम्हाला निसर्गस्नेही पद्धतीने जास्त उत्पादन कसे घ्यावे, पर्यावरणाचे संरक्षण कसे करावे, आणि कमी खर्चात शेतीतून अधिक नफा कसा मिळवावा हे शिकायला मिळेल.

### ❖ कृषी अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- करिअर संधी ; कृषी अधिकारी ,कृषी उद्योजक व्यवहारीक अनुभव
- विद्यार्थ्यांमध्ये नवीन कल्पना व प्रयोगशीलता प्रेरणा विकसित
- सेंद्रिय शेतीचे महत्त्व व प्रात्यक्षिक ज्ञान

### ❖ प्रवेशासाठी पात्रता

- बारावी उत्तीर्ण (कोणतीही शाखा)
- दहावी उत्तीर्ण + कृषी पदविका(डिप्लोमा)




## ❖ देवरूख शिक्षण प्रसारक मंडळ (DSPM) संस्थेविषयी :

संस्थेची स्थापना १९२७ मध्ये स्वर्गीय काकासाहेब पंडित यांच्या प्रेरणेतून झाली. देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ (DSPM) ही महाराष्ट्रातील कोकण विभागातील एक सर्वात जुनी व प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था आहे. 'राष्ट्र म्हणजे ईश्वर आणि राष्ट्रसेवा हिच ईश्वर पूजा' या पवित्र तत्त्वाच्या आधारावर संस्था कार्यरत आहे. संस्थेअंतर्गत हायस्कूल, इंग्रजी माध्यम शाळा, कला-वाणिज्य-विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, कला-वाणिज्य-विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पीएच.डी. संशोधन केंद्र, व्यावसायिक शिक्षण संस्था आणि क्रीडा अकादमी चालवले जातात. सध्या संस्थेच्या विविध शाखांमध्ये सुमारे ४२०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

संस्थेच्या शैक्षणिक संकुलात शहीद स्मारक आणि कला दालनही आहे, जे संस्थेच्या देशप्रेम आणि संस्कृतीप्रेमाची साक्ष देतात. पर्यावरणपूरक दृष्टिकोन अंगीकारून, संकुलावर ७५ किलोवॅट क्षमतेची सौरऊर्जा प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, हरित ऊर्जा आणि हरित पथ्वीप्रती संस्थेची बांधिलकी अधोरेखित केली आहे.

## ❖ आमच्या महाविद्यालयाविषयी

- यूजीसी व मुंबई विद्यापीठ मान्यताप्राप्त कोकणातील पहिले स्वायत्त महाविद्यालय.
- मुंबई विद्यापीठाचा 'सर्वोत्तम महाविद्यालय पुरस्कार' प्राप्त.
- नॅकचा 'अ' दर्जा प्राप्त.
- १९७२ साली स्थापना, शैक्षणिक उत्कृष्टतेची गौरवशाली परंपरा.

## ❖ अभ्यासक्रम कालावधी : तीन किंवा चार वर्षे

## ❖ परीक्षा पद्धती:

४०% अंतर्गत मूल्यमापन (Internal Assessment)

६०% सेमिस्टर अखेरची परीक्षा (External Assessment)

अंतर्गत व बाह्य दोन्ही घटकांमध्ये स्वतंत्र उत्तीर्ण होणे आवश्यक.

### उत्तीर्ण होण्याचे निकष:

प्रत्येक घटकात किमान ४०% गुण आवश्यक.

## ❖ भविष्यातील संधी:

कृषी अधिकारी कृषी उद्योजक करिअर संधी.

प्लेसमेंट सहाय्य व इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध.

प्रत्यक्ष अनुभवासाठी उद्योग क्षेत्राशी भागीदारी.

अधिक माहितीसाठी आमच्या संकेतस्थळाला भेट द्या किंवा प्रवेशासंबंधी माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधा.

https://aspcdevrukh.ac.in/

contact no.

(02354) 260058, 261058
dspmaspoffice@gmail.com

**Embark on a Journey of Innovation & Excellence!**

**आजच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश घ्या आणि कृषी क्षेत्रामध्ये उज्वल भविष्य घडवा !**

